ePaper


## मी निवडून आलो असतो तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले असते : शहाजी बापू

| वर्ष - 8 | अंक - 271 | UDYAM-MH-26-0158827 |




महाईन्यूज ™




www.mahaenews.com | गुरुवार , दि. 1 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### दिवसभर नरेंद्र मोदींच्या उच्चस्तरीय बैठका; आता माघार नाही

# मोदींनी फुंकले, युद्धाचे रणशिंग!



## पाकिस्तानची ताकद किती? सात दिवस तरी निभाव धरेल का ? : संरक्षणतज्ज्ञ चिंतेत !

| नवी दिल्ली / इस्लामाबाद
| प्रतिनिधी | महाईन्यूज

**भारताने युद्धाचे रणशिंग फुंकले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारीही दिवसभर बैठकांपाठोपाठ बैठका घेतल्या. या उच्चस्तरीय बैठकांमध्ये पुन्हा एकदा भारताच्या युद्धनीतीवर आणि रणनीतीवर शेवटचा हात फिरवण्यात आला. आता माघार तर घ्यायची नाही, पण व्यवस्थित नियोजन झाल्याची खात्री करून घेण्यात येत आहे. युद्धाचे काऊंटडाऊन सुरू झाल्याचे संकेत मिळत आहेत. पाकिस्तानातील संरक्षणतज्ज्ञांच्या मते युद्ध झाल्यास पाकिस्तान सात दिवससुद्धा भारतापुढे टिकाव धरू शकत नाही.**



#### रात्रीचे 11, तरीही बैठका सुरूच..

नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी रात्री अकरा वाजता देखील उच्चस्तरीय बैठक सुरूच होती. या बैठकीला परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल, लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी हे उपस्थित होते. त्याचबरोबर तिन्ही दलाचे प्रमुख पदाधिकारी देखील उपस्थित होते.

#### पाकिस्तानकडून सतत युद्ध बंदीचे उल्लंघन

भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्सच्या महासंचालकांनी हॉटलाईनवर संवाद साधला. पाकिस्तानकडून दररोज विनाकारण होत असलेल्या युद्धबंदीच्या उल्लंघनावर यावेळी चर्चा झाली.

#### 'रा सु सल्लागार मंडळा' ची पुनर्रचना..

केंद्र सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाची पुनर्रचना केली आहे. माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांना त्याचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची (सीसीएस) पंतप्रधानांच्या निवासस्थानी प्रदीर्घ बैठक झाली.

#### दूतावासातील 22 कर्मचारी परतले!

भारतीय राजदूतांनी पाकिस्तान सोडले असून अटारी-वाघा सीमेवरून भारतीय दूतावासातील २२ कर्मचारी मायदेशी परतले आहेत.

#### पंजाब सीमेवर 'अँटी ड्रोन सिस्टीम'

पाकिस्तानच्या सीमेवर 'अँटी ड्रोन सिस्टीम' तैनात केल्या जात आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर पंजाब राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारच्या मदतीने ही प्रणाली स्थापित करण्यात आली आहे. शस्त्रांचा पुरवठा थांबवण्यास ती मदत करेल तसेच पोलीस आणि सुरक्षा संस्था कोणत्याही प्रकारच्या गोष्टीवर लक्ष ठेवू शकतील.

#### 'एनआयए' कडून शोध सुरूच..

पहलगाम दहशतवादी हल्ल्याची संपूर्ण चौकशी 'एनआयए' कडे सोपवण्यात आली असून या पदाधिकाऱ्यांनी दिवसभर अनेक गावांना भेटी देत शोध सुरू ठेवला आहे. या हल्ल्याचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांना बैसरण खोऱ्यातून चाळीस जिवंत काडतूसे सापडली आहेत. 'फॉरेन्सिक टीम' चे दोन सदस्य देखील 'एनआयए' सोबत तपास करीत आहेत. हे सदस्य स्थानिक पोलीस आणि सीआरपीएफ च्या मदतीने घनदाट जंगलात पुरावे गोळा करीत आहेत, त्यांना मोठ्या प्रमाणावर यशही मिळत आहे.

#### काश्मीर खोऱ्यातील 48 पर्यटन स्थळांवर बंदी..

सध्या संपूर्ण काश्मीर खोऱ्यामध्ये 'एनआयए' च्या टीमकडून शोध सुरू असून खोऱ्यातील ४८ पर्यटन स्थळांवर पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. काश्मीर विभागीय आयुक्तांनी तेथील सर्व हॉटेल्स, होम स्टे, इतर गेस्ट हाऊस, हाऊसबोट मालक आणि इतरांना पर्यटकांच्या बुकिंगची अगाऊ रक्कम परत करण्याचे निर्देश दिले आहेत.

### आज किंवा उद्या भारत हल्ला करु शकतो...

पाकिस्तानचे माहिती आणि प्रसारणमंत्री अताउल्लाह तरार यांनी पाकिस्तानमध्ये रात्री दोन वाजता पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या हाती अत्यंत गोपनीय माहिती पोहचल्याचे पत्रकारांना सांगितले. भारताची युद्धाची संपूर्ण तयारी झाली असून गुरुवारी किंवा शुक्रवारी भारत कोणत्याही क्षणी पाकिस्तानवर हल्ला करू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. भारतामध्ये होत असलेल्या गोपनीय बैठकांचा अहवाल आपल्या हाती येत असून त्यांनी त्यांच्या सोशल मिडिया हँडल 'एक्स' वर एक व्हीडिओदेखील शेअर करून हा हल्ल्याचा दावा केला आहे. पाकिस्तानातील काही ज्येष्ठ नेते आणि मंत्री देश सोडून कॅनडामध्ये वास्तव्याला गेले आहेत का? या प्रश्नावर त्यांनी मौन पाळले आणि नंतर होकारात्मक मान हलवली.



ePaper
मी निवडून आलो असतो तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले असते : शहाजी बापू
| वर्ष - 8 | अंक - 271 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज™




www.mahaenews.com | गुरुवार , दि. 1 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महायुती सरकारचा महत्त्वाकांक्षी ‘100 दिवस कृती आराखडा’

# अभियानाच्या ‘गुणवत्ता यादी’त चमकण्यासाठी अखेरची धडपड!

### खराब कामगिरी असलेल्या विभागाच्या सचिवांवर कारवाईची कुऱ्हाड कोसळणार

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘१०० दिवस कृती आराखडा’ अभियानाच्या गुणवत्ता यादीत चमकण्यासाठी बुधवारी अखेरच्या क्षणी अनेक विभागांची धावपळ सुरू होती. महाराष्ट्र दिनी-गुरुवारी या अभियानाचा निकाल जाहीर होणार असून, त्यात विजेत्यांचा सन्मान होणार आहे. ज्यांची कामगिरी चांगली नसेल, त्या विभागाच्या सचिवांवर कारवाईची कुऱ्हाड कोसळणार असल्याने रात्री उशिरापर्यंत अनेक विभागांची धावपळ सुरू होती.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सत्तासूत्रे स्वीकारताच सरकारच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार मंत्रालयातील सर्व ४८ विभागांना लोकहिताच्या योजना, उपक्रमांची अंमलबाजवणी करण्याबाबतच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले होते.

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी या अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला होता. त्या वेळी या मोहिमेंतर्गत विविध विभागांनी घोषित केलेल्या एकूण ९३८ योजना-उपक्रमाच्या मुद्द्यांपैकी मार्च अखेर ४४ टक्के मुद्द्यांबाबत-कामांसंदर्भातील कार्यवाही पूर्ण झाली होती. तर कार्यवाही सुरू असलेली कामे १ मेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले होते.

अभियानाचा निकाल गुरुवारी जाहीर होणार आहे. त्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पाच मंत्रालयीन विभागांचे सचिव, पाच मंत्रालयीन विभागांचे आयुक्त/संचालक, पाच जिल्हाधिकारी, पाच पोलीस अधीक्षक, पाच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, चार महापालिका आयुक्त, तीन पोलीस आयुक्त, दोन विभागीय आयुक्त आणि दोन पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक यांची नावे जाहीर केली जाणार आहे.

### कारवाईची कुऱ्हाड कोणावर?

अभियानात चांगली कामगिरी करणाऱ्या विभागांचा, त्यांच्या सचिवांचा सन्मान होणार असला तरी ज्यांची कामगिरी खराब असेल त्यांच्यावर येत्या काळात कारवाईची कुऱ्हाड कोसळणार आहे. आजवर अशा अभियानाकडे विभागाचे सचिव फारशे गांभीर्याने पाहत नव्हते. मात्र या वेळी हे अभियान गांभीर्याने न घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून मंत्रालयात प्रशासनाची चांगलीच धावपळ सुरू होती.

आपला विभाग गुणवत्ती यादीत चमकावा यासाठी अनेक विभागाचे सचिव कामाला लागले असून संपूर्ण यंत्रणाही या अभियानात मांडलेल्या आराखड्याची पूर्तता करण्यात मग्न असल्याचे चित्र मंत्रालयात दिसत होते. आधी जाहीर केलेल्या मात्र आता पूर्तता करण्यात अडचणी येत असलेल्या योजना, मुद्दे अभियानाच्या आराखड्यातून वगळावे यासाठी काही विभागाचे अधिकारी धावपळ करीत होते.

### सांस्कृतिक कार्य विभागाचे 100 टक्के उद्दिष्ट साध्य

कृती आराखड्यानुसार सांस्कृतिक कार्य विभागाने एनडी स्टुडिओ ताब्यात घेणे, एक खिडकी योजना, महाराष्ट्र भूषण पुरस्कारार्थींची निवड अशी हाती घेतलेली सहा कामे १०० दिवसांत पूर्ण करून १०० टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे. अशाच प्रकारे जलसंपदा, मत्स्य विकास, माहिती आणि तंत्रज्ञान, कामगार, ग्रामविकास आणि सार्वजनिक आरोग्य आदी विभागांनी उद्दिष्टांच्या ७० टक्क्यांहून अधिक मुद्द्यांची पूर्तता केली. एसटी कर्मचाऱ्यांचे उर्वरित वेतन मंगळवारपर्यंत तर महसूल, गृह, ऊर्जा, वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम, उद्योग, कौशल्य विकास, आदिवासी विकास, रोजगार हमी आणि मराठी भाषा आदी विभागांनी ५० ते ५० टक्के उद्दिष्टपूर्ती केली आहे. गृहनिर्माण, मदत व पुनर्वसन, उच्च व तंत्रशिक्षण, सामान्य प्रशासन(सेवा), सामाजिक न्याय, सहकार, पर्यटन, वैद्यकीय शिक्षण या विभागांनी हाती घेतलेल्या मुद्द्यांपैकी जेमतेम ३६ ते ४९ टक्क्यांपर्यंत पूर्तता केली आहे.

# मान्यतापात्र इमारतींना भोगवटापत्र!

## पीएमआरडीए'तील अनेक बांधकामांना दिलासा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'नगररचना विभागाची मान्यता घेऊनही भोगवटापत्र न मिळालेल्या बांधकामांना भोगवटापत्र दिले जाईल,' असे आश्वासन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिले. त्यामुळे 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील भोगवटापत्र न मिळालेल्या शेकडो बांधकामांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.**

पीएमआरडीए'ची स्थापना होण्यापूर्वी गेल्या दहा वर्षांपर्यंत हद्दीतील गावांमध्ये बिगरशेती (एनए) परवाना आणि बांधकाम करताना नगररचना विभागाची परवानगी घ्यावी लागत होती. त्यांच्याकडून मान्यता घेतल्यानंतर बांधकाम केल्यानंतर ते मान्यताप्राप्त बांधकाम समजले जात होते. मात्र, २०१३ पूर्वी अशी मान्यता घेऊन ज्यांनी बांधकामे केली आहेत, किंवा अशा बांधकामांत सदनिका घेतली आहे, त्यांच्याकडे भोगवटापत्र नाही, असे कारण देऊन बँकेकडून कर्ज देण्यास नकार दिला जात असून, सदनिकांची विक्री करतानाही अडचणी येत आहेत.'एमआरटीपी' ॲक्ट मधील ७.६ तरतुदीमध्ये, तसेच 'यूडीपीसीआर' (एकात्मिककृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली) मध्ये २.१० भोगवटापत्र देण्याची तरतूद आहे. हे दोन्ही कायदे 'पीएमआरडीए'लाही लागू आहेत.'पीएमआरडीए'कडे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अशा इमारतीतील नागरिकांनी अर्ज केला असता,'उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेतील एका दाव्याचा दाखल देत, असे प्रमाणपत्र देता येत नाही,' असे



कारण पुढे करण्यात येत आहे. त्यामुळे 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील शेकडो सदनिकाधारक अडकून पडले आहेत. या संदर्भात विचारले असता, डॉ. म्हसे म्हणाले, 'पीएमआरडीएच्या स्थापनेपूर्वी अधिकृत परवानगी घेऊन बांधकाम केले आहे, अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल.

नागरिकांनी त्यासाठी प्राधिकरणाकडे संपर्क साधावा. मात्र, हे प्रमाणपत्र देताना सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.'पीएमआरडीए'कडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना आणि यापूर्वीच प्रशासकीय मंजुरी मिळालेल्या कामांची माहितीही डॉ. म्हसे यांनी दिली. 'पीएमआरडीए'च्या हद्दीतील नदीप्रदूषण रोखण्यासाठीचे आराखडे, पुरंदर विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी रस्त्यांचे जाळे, औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पायाभूत सुविधांना 'पीएमआरडीए'च्या आराखड्यात मंजुरी दिली असून, त्यानुसार ही कामे सुरू करण्यात येतील,' असे डॉ. म्हसे यांनी स्पष्ट केले."पीएमआरडीए'ची हद्द ६ हजार चौरस किलोमीटरहून अधिक असून, त्यामध्ये ६९७ गावे आहेत. दुर्गम भागातील गावांमधील नागरिकांना कामासाठी 'पीएमआरडीए'च्या आकुर्डी येथील कार्यालयात यावे लागते. त्यांची गैरसोय टाळण्यासाठी 'पीएमआरडीए'ने आठ गावांत त्यांची कार्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. एक मेपासून ही कार्यालये सुरू करण्यात येणार आहेत,' असेही डॉ. योगेश म्हसे यांनी या वेळी सांगितले.पीएमआरडीए'ची स्थापना होण्यापूर्वी गेल्या दहा वर्षांपर्यंत हद्दीतील गावांमध्ये बिगरशेती (एनए) परवाना आणि बांधकाम करताना नगररचना विभागाची परवानगी घ्यावी लागत होती. त्यांच्याकडून मान्यता घेतल्यानंतर बांधकाम केल्यानंतर ते मान्यताप्राप्त बांधकाम समजले जात होते.

### 2.10 भोगवटापत्र देण्याची तरतूद

मात्र, २०१३ पूर्वी अशी मान्यता घेऊन ज्यांनी बांधकामे केली आहेत, किंवा अशा बांधकामांत सदनिका घेतली आहे, त्यांच्याकडे भोगवटापत्र नाही, असे कारण देऊन बँकेकडून कर्ज देण्यास नकार दिला जात असून, सदनिकांची विक्री करतानाही अडचणी येत आहेत.'एमआरटीपी' ॲक्ट मधील ७.६ तरतुदीमध्ये, तसेच 'यूडीपीसीआर' (एकात्मिककृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली) मध्ये २.१० भोगवटापत्र देण्याची तरतूद आहे. हे दोन्ही कायदे 'पीएमआरडीए'लाही लागू आहेत. 'पीएमआरडीए'कडे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अशा इमारतीतील नागरिकांनी अर्ज केला असता, 'उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेतील एका दाव्याचा दाखल देत, असे प्रमाणपत्र देता येत नाही.

# 'सीआयएससीई'च्या अनेक विद्यार्थ्यांना ९० टक्के

## मंडळाशी संलग्न शहरातील बहुतांश शाळांचे निकाल उत्तम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन अर्थात सीआयएससीई मंडळाने जाहीर केलेल्या दहावी (आयसीएसई) आणि बारावीच्या (आयएससी) परीक्षांच्या निकालात शहरातील बहुतांश शाळांचा निकाल १०० टक्के लागला. अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण पटकावले.**



लष्कर भागातील बिशप्स स्कूलच्या वीरेन लुनिया या दहावीच्या विद्यार्थ्याने ९८ टक्के गुणांसह शाळेत पहिला क्रमांक मिळवला. बारावीच्या परीक्षेत पवित्रा कुमार, ओजस देशपांडे, विदिती भंडारी आणि आदित्य चौरे यांनी ९८.५ टक्के गुणांसह संयुक्त प्रथम स्थान पटकावले. कल्याणीनगर येथील बिशप्स स्कूलमधील मीरा सेल्वाडोराय हिने ९८.८० टक्के, तर उंड्री येथील बिशप्स स्कूलमधील भाविशा अगरवाल हिने ९८.४० टक्के गुण मिळवले. क्लाइन मेमोरियल स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला. शरण्या चव्हाण, रुचा डेरे आणि शंतनू वाल्हेकर या तिघांनी ९६.२ टक्के गुणांसह पहिला क्रमांक पटकावला. सृष्टी शिंदे आणि गार्गी पेटकर यांना ९५.८ टक्के गुण मिळाले.लोहगाव येथील कावेरी इंटरनॅशनल स्कूलमधील आर्यन मालुसरे याने ९५ टक्के गुण प्राप्त केले. सेंट मेरीज स्कूलच्या दहावी आणि बारावीचा निकाल १०० टक्के लागला. त्यात दहावीच्या अविशा जॉन या विद्यार्थिनीने ९९.३ टक्के, तर बारावीच्या डिशा लुंकार हिने ९८.७५ टक्के गुण मिळवले. 'निकाल पाहून खूप आनंद झाला. माझ्या यशाचे श्रेय पालक आणि शिक्षकांना आहे. दररोज चार ते पाच तास अभ्यास करायचे. गरजेनुसार जास्त वेळही अभ्यास व्हायचा,' अशी भावना अविशाने व्यक्त केली.बालेवाडी येथील 'विब्ग्योर हाय' शाळेतील रिद्धिमा गोस्वामीने ९९.२० टक्के, विदित जैनने ९९ टक्के, तर नीन्व घोषने ९७.८३ टक्के, मगरपट्टा सिटी येथील विब्ग्योर हायस्कूलच्या रेहान अरोराने ९८ टक्के, एनआयबीएम येथील विब्ग्योर हाय शाळेच्या सारा शेट्येने ९८.८४ टक्के गुण मिळवले. विद्या प्रतिष्ठानच्या मगरपट्टा येथील सिटी पब्लिक स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. त्यात मनस्वी देशपांडे हिने ९८.८ टक्के, आदित्य गुप्ता, साहिल गुप्ता, यश जगदाळे आणि शर्वी शिंपी या चौघांनी ९८.६ टक्के, तर भार्गव कविटके याने ९८.४ टक्के गुण मिळवले.नांदेड सिटी पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. त्यात अदिती गौराजे या विद्यार्थिनीला ९८.२० टक्के, वृषाली हावळेला ९८ टक्के, तर ग्रीष्मा पहाडेला ९७.४० टक्के गुण मिळाल्यात अदिती पवार, सम्योजॉय दास यांना ९८.६ टक्के, त्रिशा पटानीला ९८.१ टक्के गुण मिळाले. सूस येथील विद्या व्हॅली स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. त्यात आर्यमान देशमुखने ९८.८ टक्के, भौमिक पंजाबीने ९८.५ टक्के, क्षितिज जोशीने ९८ टक्के गुण मिळवले.लष्कर भागातील बिशप्स स्कूलच्या वीरेन लुनिया या दहावीच्या विद्यार्थ्याने ९८ टक्के गुणांसह शाळेत पहिला क्रमांक मिळवला. बारावीच्या परीक्षेत पवित्रा कुमार, ओजस देशपांडे, विदिती भंडारी आणि आदित्य चौरे यांनी ९८.५ टक्के गुणांसह संयुक्त प्रथम स्थान पटकावले. कल्याणीनगर येथील बिशप्स स्कूलमधील मीरा सेल्वाडोराय हिने ९८.८० टक्के, तर उंड्री येथील बिशप्स स्कूलमधील भाविशा अगरवाल हिने ९८.४० टक्के गुण मिळवले.

### आर्यन मालुसरे याने 95 टक्के गुण

क्लाइन मेमोरियल स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला. शरण्या चव्हाण, रुचा डेरे आणि शंतनू वाल्हेकर या तिघांनी ९६.२ टक्के गुणांसह पहिला क्रमांक पटकावला. सृष्टी शिंदे आणि गार्गी पेटकर यांना ९५.८ टक्के गुण मिळाले.लोहगाव येथील कावेरी इंटरनॅशनल स्कूलमधील आर्यन मालुसरे याने ९५ टक्के गुण प्राप्त केले.

## यंदा पालखी सोहळ्याचे 340 वे वर्ष

# संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे 18 जूनला प्रस्थान!

## तिथीचा क्षय झाल्याने अंथुर्णे येथील मुक्काम रद्द

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**आषाढी वारीसाठी जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून १८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पायी पालखी सोहळा ६ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. ६ ते १० जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे. वारकरी संप्रदायाला ज्या क्षणाची आस लागून असते, त्या आषाढी पालखी प्रस्थानाची घोषणा झाली आहे. पालखी सोहळ्यात तिथीचा क्षय झाल्याने अंथुर्णे येथील मुक्काम रद्द केला आहे.**



देहूगाव येथील श्री संत तुकाराम महाराजांच्या ३४० व्या पालखी सोहळ्यासाठी गणेश महाराज मोरे, वैभव महाराज मोरे, दिलीप महाराज मोरे यांची पालखी सोहळा प्रमुख म्हणून घोषणा संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी केली. यावेळी संस्थानचे विश्वस्त विक्रमसिंह महाराज मोरे, उमेश महाराज मोरे आदी उपस्थित होते.

यंदा पालखी सोहळ्याचे ३४० वे वर्ष आहे. याबाबतची माहिती देहू संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी दिली. पालखीचे प्रस्थान १८ जून रोजी होणार असून पहिला मुक्काम येथील इनामदार वाड्यात होईल. १९ जून रोजी संध्याकाळी पालखी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात दुसऱ्या मुक्कामासाठी थांबेल. २० आणि २१ जून रोजी पालखी पुण्यात नाना पेठेतील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल, २२ जून रोजी पालखी पुण्यातून लोणी काळभोर कदम वाकवस्ती पालखीतळाकडे रवाना होईल, येथेच नव्या पालखी तळावर मुक्कामी राहिल. २३ जून रोजी यवत येथील भैरवनाथ मंदिर पालखी तळावर मुक्कामी असेल. २४ जून रोजी वरवंड येथील विठ्ठल मंदिरात, २५ जूनला उंडवडी गवळ्याची येथे, २६ जूनला बारामती शारदा विद्यालयाच्या प्रांगणात, २७ जूनला सणसर येथे पालखी मुक्कामी असेल. २८ जूनला पालखी सणसर मधून पहाटे निघेल, बेलवडी येथे पहिले (गोल रिंगण) होईल. रात्री निमगाव केतकी येथे पालखी तळावर मुक्कामासाठी जाईल. २९ जूनला पालखीचे इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण होईल. येथेच मुक्कामी असेल, ३० जूनला पालखी सराटी येथे मुक्कामी असेल. १ जुलै रोजी सकाळी संत तुकाराम महाराजांच्या पादुकांना सराटी येथे निरा स्नान घालुन पुढे पालखी अकलुजकडे मार्गस्थ होईल. येथे दुपारी तिसरे गोल रिंगण पूर्ण करेल. त्यानंतर पालखी अकलुजच्या माने विद्यालयाच्या प्रांगणामध्ये मुक्कामासाठी रवाना होईल. २ जुलैला पालखी अकलुज वरून सकाळी निघेल, दुपारी पालखी मार्गावरील माळीनगर येथे पहिले उभे रिंगण होईल. त्यानंतर पालखी रात्री बोरगाव येथील पालखी तळावर मुक्कामी राहिल. ३ जुलैला तोंडले बोंडले येथे धावा करून पालखी पिराची कुरोली येथे मुक्कामासाठी रवाना होईल. ४ जुलैला पालखीचे सायंकाळी बाजीराव विहिर येथे दुसरे उभे रिंगण पार पडेल. त्यानंतर पालखी वाखरी येथील पालखी तळावर मुक्कामी राहिल. ५ जुलै रोजी पालखी सकाळी वाखरी येथून पंढरपूरकडे रवाना होईल. सायंकाळी पादुका आरतीस्थळी पालखी सोहळ्यातील शेवटचे व तिसरे उभे रिंगण पार पडेल. त्यानतंर पालखी सायंकाळी श्री क्षेत्र पंढरपूर शहरात प्रवेश करेल आणि रात्री पालखी येथील श्री संत तुकाराम महाराज मंदिर नवीन इमारतीमध्ये विसावेल. येथे पालखी ६ जुलै ते गुरूवार १० जुलैअखेर मुक्कामी असेल. १० जुलैला पालखी सोहळा दुपार नंतर देहूकडे परतीच्या प्रवासाला सुरवात करेल. हा १२ दिवसांचा परतीचा प्रवास संपवून हा सोहळा श्री क्षेत्र देहूगाव येथे २१ जुलैला दुपारी पोहचेल.

### सायंकाळी आठ वाजता होणार समाज आरती

भाविकांची सोय व्हावी, दिंडी चालकांना मुक्कामाच्या ठिकाणी लवकरात लवकर पोहचता यावे यासाठी शहरी भागात सायंकाळी ८ वाजता समाज आरती घेण्यात येणार आहे.

### दोन जुलैला माळीनगर येथे उभे होणार रिंगण

२९ जूनला पालखीचे इंदापूर रात्री पालखी इंदापूर येथे मुक्कामी व असेल, ३० जूनला पालखी सराटी येथे मुक्कामी असेल. १ जुलै रोजी सकाळी संत तुकाराम महाराजांच्या पादुकांना सराटी येथे निरा स्नान घालून पुढे पालखी अकलुजकडे मार्गस्थ होईल. व येथे दुपारी तिसरे गोल रिंगण पूर्ण करेल. पालखी अकलुजच्या माने विद्यालयाच्या प्रांगणामध्ये मुक्कामासाठी रवाना होईल. २ जुलैला पालखी अकलुजवरून सकाळी निघेल व दुपारी पालखी मार्गावरील माळीनगर येथे पहिले उभे रिंगण होईल. त्यानंतर पालखी रात्री बोरगाव येथील पालखी तळावर मुक्कामी राहील. ३ जुलैला पालखी पिराची कुरोली येथे मुक्कामासाठी रवाना होईल.

---

## नागरिकांच्या तक्रारी ऐकून घ्या! : पीएमआरडीए आयुक्त

# नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी अधिकाऱ्यांना उपस्थित राहणे बंधनकारक

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी |


**पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) हद्द मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे वेगवेगळ्या नऊ तालुक्यांतून नागरिक, ग्रामस्थ हे विविध कामासाठी पीएमआरडीएमध्ये येत असतात. मात्र, अनेकदा या ठिकाणी आल्यावर त्यांना अधिकाऱ्यांची भेट होत नाही. त्यामुळे महानगर आयुक्तांनी नागरिकांना भेटण्यासाठी अधिकाऱ्यांना वेळ ठरवून दिल्या आहेत. अनेकदा त्यावेळी अधिकारी जागेवर नसतात. त्यामुळे आता संबंधित अधिकाऱ्याविरोधी तक्रार प्राप्त झाल्यास कारवाई करण्यात येईल, असे प्रशासन विभागाकडून सांगण्यात आले आहे.**




नागरिकांच्या अडचणी, तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कामकाजात सुलभता आणण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुरु आहेत. त्याच अनुषंगाने अधिकाऱ्यांच्या भेटण्याच्या वेळा ठरविण्यात आल्या होत्या. मात्र, तरीही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने पीएमआरडीए प्रशासनाकडून त्याबाबत कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. प्रत्यक्षात सोमवार ते गुरुवार या चार दिवसांत संबंधित विभागाचे मुख्य अधिकारी हे नागरिकांसाठी उपलब्ध असतील. कामातील अडचणी, समस्या अथवा त्या विभागाच्या तक्रारीच्या अनुषंगाने भेटता येईल. तर, विकास परवानगी विभागात नागरिकांना काम होत नसल्याने हेलपाटे मारावे लागत होते. त्यानुसार, सहायक नगररचनाकार हे उपलब्ध असतील. तसेच, इतर विभागातील उपायुक्त व कार्यकारी अभियंता देखील या वेळेत नागरिकांच्या सेवेसाठी असणार आहेत. त्याचप्रमाणे नागरिकांना थेट आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे तक्रारी मांडता येणार आहे. त्यामुळे संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी याची नोंद घेण्याबाबत सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. अन्यथा, आयुक्तांकडून आलेल्या परिपत्रकानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

> ‘नागरिकांच्या तक्रारी, त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळा ठरविल्या आहेत. अधिकारी वर्गाने त्यावेळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्याबाबतच्या तक्रारी आल्यास आयुक्तांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात येईल.”
> **- पूनम मेहता** (सह आयुक्त - प्रशासन विभाग, पीएमआरडीए)

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### जेथे भगवंताचें नामस्मरण। तेथे सर्व संतांचें ठाण॥

जोंवर धरिली जगाची आस। तोंवर परमात्मा दूर खास॥ परमात्म्याची प्राप्ति। न होई राखता विषयासक्ति॥ जग विषयाकार राहिले। तेथे प्रेम केले तरी घातासी आले॥ विषयी एकजीव झालो जाण। सुटता न सुटे आपण जाण॥

मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख। हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण॥ अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण॥ सुख-दु:ख, विपत्ति-आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती॥ आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण॥

आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण॥ जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें॥ एकच वस्तूची ओळखण जाण। पूर्ण होते समाधान॥ ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दु:ख॥ नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण॥

जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास॥ देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा॥ मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त॥ दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें॥

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण॥ देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण॥ विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग॥ आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण॥

चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले॥ रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी॥ द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण॥ सृष्टि पाहावी भगवदाकारी। प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी॥

आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति॥ न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास॥

**बोधवचन:- देहासकट माझा प्रपंच। रामा केला तुला अर्पण॥ ऐसें वाटत जावें चित्तीं। कृपा करील रघुपति॥**

# नरेंद्र मोदींचे धक्का तंत्र, युद्धापूर्वीच यशाचा मंत्र!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पटापट निर्णय घेतले. प्रत्यक्षात अजून कोणतीही कारवाई झालेली नसली तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे धक्का तंत्र पाहून पाकिस्तानची गाळण उडाली आहे. अर्थात् युद्धनीतीमध्ये अशा प्रकारच्या धक्का तंत्राला फार महत्त्व असते, आणि ते नरेंद्र मोदी यांनी अचूक साधले आहे!**



### युद्ध सुरू होण्यापूर्वीच जिंकले..

पाकिस्तानबरोबर प्रत्यक्ष युध्द सुरु होण्यापूर्वीच ते जिंकायचे असेल तर शत्रूच्या मनात धडकी भरवण्याइतका उत्तम उपाय दुसरा नाही. त्यामुळे शत्रूचे मनोधैर्य एकदम कोसळते आणि युध्दे मनोधैर्यावरच तर जिंकली जातात! कसलेला सेनानी आणि मुत्सद्दी नेता नेहमीच या शस्त्राचा वापर करत असतो.

### इतिहास 'संताजी-धनाजी' चा !

औरंगजेबाच्या घोड्यांना पाण्यात संताजी- धनाजी दिसत होते, असे म्हटले जाते, ते याच 'धडकी' तंत्रामुळे..शत्रूला गोंधळात टाकणे हाच या धडकी तंत्राचा पाया असतो. हा वारसा खरे तर छत्रपती शिवाजी महाराजांचा.. आग्र्याच्या कैदेतून छत्रपती शिवाजी महाराज पळाले, तर 'ते कसे पळाले?, खिडकीतून पळाले की दरवाजातून पळाले?, जमिनीतून गेले की आकाशातून गेले?' असे आक्रस्ताळी अकांडतांडव औरंगजेबाने केले होते, असे म्हणतात. सिद्दी जौहरच्या वेढ्यातून महाराज निसटले तेव्हा सिद्दीने महाराजांच्या पाठलागावर सैन्य पाठवले, पण तो स्वतः वेढ्यातच थांबला. कारण 'पळाले कोणी दुसरेच असेल आणि खरे महाराज गडावरच असतील' असे त्याला वाटले होते.

### बेसावध शत्रू, अचूक कामगिरी!

शत्रूला बेसावध ठेवणे, आपल्या डावपेचांचा थांगपत्ता त्याला न लागू देणे आणि त्याला सतत अस्थिर ठेवणे हे सर्वाधिक महत्वाचे असते. भाजपमध्ये मोदी - शाहांशिवाय कुणालाच काही माहीत नसते, अशी एक कुत्सित टीका नेहमी होते. पण, युध्दाच्या कारवाईच्या संदर्भात ही गोपनीयता हा खरा गुण ठरतो. अर्थात् सामर्थ्य असेल तरच शत्रूच्या मनात अशी धडकी भरवता येते आणि बिथरलेला शत्रू भांबावून नको ते उपाय योजण्यात अडकतो. लक्षात घ्या, मोदींच्या इशाऱ्यानंतर पाकिस्तानची अशीच भंबेरी उडाली आहे!

### कुठे, कसे आणि केव्हा ?

युध्द कुठे, कसे आणि केव्हा करायचे, हे जो सेनापती यशस्वीपणे ठरवू शकतो, तोच युध्द जिंकू शकतो, असा युध्दशास्त्रातला दुसरा नियम आहे. आपल्याला अनुकूल असेल, त्या ठिकाणी शत्रूला यायला भाग पाडणे आणि आपण ठरवलेल्या वेळेला त्याच्यावर हल्ला करणे, ही युध्द जिंकण्याची पहिली पायरी आहे. बाजीराव पेशव्यांनी पालखेडच्या लढाईत नेमके हेच सूत्र अवलंबिले होते.अशा डावपेचात नेपोलियन तज्ज्ञ होता, हे इतिहास सांगतो.

### हल्ल्याचे नियोजन चुकीचे..

आता, पहलगाममधील हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या स्थितीशी वरील निकष ताडून पाहू. दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात देशातील वीस राज्यांमधील नागरिक मृत्युमुखी पडले. परिणामतः संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. दहशतवाद्यांची चूक झाली, ती इथेच! आपोआपच सगळा देश एकवटला. या हल्ल्याचा परिणाम एवढा जबरदस्त होता, की वक्फ विरोधातील आंदोलन विरले. राहुल गांधी यांच्या अमेरिकेतील बोलण्याची दखलही भारतीयांनी घेतली नाही. म्हणजे त्यावरुन रान माजवण्याचे त्यांचे मनसुबे वाया गेले. उध्दव आणि राज ठाकरे एकत्र येण्याविषयीच्या फालतू बातम्या पाचोळ्या सारख्या उडून गेल्या. आता, एकत्र येण्यापेक्षा कोण आधी मोदींना पाठिंबा देतो, याची स्पर्धा या दोन नेत्यात येत्या काही दिवसात लागली, तर आश्चर्य वाटायला नको.

### टीकेऐवजी सहानुभूतीच..

नरेंद्र मोदी सौदी अरेबियात असतांना पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला केला. मोदी नसल्यामुळे गोंधळ माजेल, असा त्यांचा कयास असावा. पण झाले उलटेच. मोदी भारतात असतांना हल्ला झाला असता तर कदाचित टीकेचा रोख मोदींकडे वळला असता. पण, ते परदेशात असल्याने आणि अतिशय महत्वाचा दौरा अर्धवट सोडून परत आल्यामुळे त्यांना सहानुभूतीच मिळाली. आल्या आल्या त्यांनी विमानतळावरच आढावा बैठक घेतल्यामुळे त्यांच्या निर्धाराची लोकांना कल्पना आली.

### आडाखे चुकले आणि बावचळले !

असे आडाखे चुकले की काय करावे ते कळत नाही आणि निर्णय घेण्यात गफलत होते. पाकिस्तानचं नेमके तसेच झाले आहे. भारत प्रतिहल्ला करणार हे नक्कीच, पण तो कुठे प्रतिहल्ला करेल, याचा पाकिस्तानला अंदाज येत नाही, त्यामुळे त्यांची त्रेधा उडाली आहे. भारताचे लक्ष पाकव्याप्त काश्मीरवर आहे, असे वाटून पाकिस्तानने आपली लढाऊ विमाने कराचीहून उत्तरेकडे नेली. उत्तरेकडील आणि काश्मीर, पंजाब लगतच्या सीमेवरील कुमक वाढवली. पण, भारताने अचानक आय. एन. एस. सुरत या युध्दनौकेवरुन एका क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीरीत्या केली. म्हणजे आता भारत उत्तरेतून घुसणार की समुद्रमार्गे हल्ला करणार, असा भ्रम निर्माण झाल्याने पाकिस्तान अधिकच बावचळला.

### पाकची भूमिका पायावर दगड पडण्यासारखी..

भारताने सिंधु पाणी वाटप करार स्थगित केला तर त्याला उत्तर म्हणून पाकिस्तानने सिमला करार रद्द करण्याची हास्यास्पद धमकी दिली. आता, सिंधु करार स्थगित करुन भारताने पाकिस्तानच्या तोंडचे पाणी पळवले. पण, सिमला करार रद्द झाल्याने असे काय बिघडणार आहे? तो करार मोडून पाकिस्तानने काश्मीरचा प्रश्न जगाच्या चव्हाट्यावर नेला तरी काय बिघडणार आहे? आणि तसेही पाकिस्तानला जगात आता शून्य किंमत उरली आहे. तुर्कस्थानशिवाय त्याला कोणी विचारत नाही.

### पाकिस्तानची जागतिक पत संपली..

पाकिस्तानची जगाच्या बाजारातील पत नाहीशी करणे, हीच तर मोदींच्या पाकविरोधी धोरणाची पहिली पायरी होती. मोदी आज त्यात कमालीचे यशस्वी झाले आहेत. पाकिस्तानने भारतासाठी आपली हवाईजागा बंद केली आहे. भारतही तसेच प्रत्युत्तर देईल. यात नुकसान पाकिस्तानचेच आहे. पाकिस्तानी विमाने भारतीय हद्दीतून बांगलादेश, म्यानमार, इंडोनेशिया, थायलंड या देशांना जाऊ शकणार नाहीत. यात बांगला देशाचा जास्त कोंडमारा होणार आहे. वाहतुकीचा वाढता खर्च पाकिस्तानला अजिबात परवडणार नाही.

### मोदींचे एका दगडात अनेक पक्षी..

आज पाकिस्तानचा शेअरबाजार कोसळला, तो यामुळेच. एका दगडात अनेक पक्षी मारण्याच्या कलेत मोदींचा हात कोणी धरू शकणार नाही, हेच खरे. भारतात हे राहुल, सोनिया, पवार, ठाकरे, अखिलेश यांना जसे समजले, तसेच ते आता पाकिस्तानलाही समजून चुकणार आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जनगणना करण्याचा निर्णय ऐतिहासिक!

## जनगणना करण्याच्या निर्णयावर फडणवीसांची प्रतिक्रिया

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महायुती सरकारमधील रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते आग्रही आहेत. पण जेव्हा पालकमंत्री पदाची यादी जाहीर झाली होती, तेव्हा रायगडचं पालकमंत्री पद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या आदिती तटकरे यांना तर नाशिकचं पालकमंत्री पद भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्याकडे देण्यात आलं होतं. मात्र, यानंतर दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थगिती दिली होती.**



गेल्या अनेक वर्षांपासून जातनिहाय जनगणना करण्याची मागणी करण्यात येत होती. आता केंद्र सरकारने या संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने जातनिहाय जनगणना करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाची आज महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत जातनिहाय जनगणना करण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या या निर्णयावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जातनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयामुळे समाजिक न्यायाचं नवं पर्व सुरु झालं असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.मोदी सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय हा ऐतिहासिक निर्णय आहे. भारतात १९३१ नंतर पहिल्यांदा जातनिहाय जनगणना होणार आहे. याआधी मनमोहन सिंग यांच्या सरकारने जातनिहाय जनगणना करणार असा निर्णय घेतला होता. मात्र, त्यांच्या सरकारच्या मंत्रिमंडळामधून विरोध झाल्यामुळे त्या निर्णयाला त्यांनी एसीसीमध्ये त्यांनी बदललं आणि जातनिहाय जनगणना करण्याऐवजी ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून सर्व्हे केला. पण त्याचेही आकडे कधीच प्रकाशित झाले नाहीत", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.शेवटच्या घटकापर्यंत जर सामाजिक न्याय पोहोचवायचा असेल तर जातनिहाय जनगणनेच्या माध्यमातून समाजात कोण मागे राहिलेलं आहे.

याचा इम्पिरिकल डेटा देखील समोर येईल. त्यामुळे आपल्याला योग्य लोकांना योग्य सवलती देऊन या देशातील समाजांना पुढे घेऊन जाता येईल. या अनुषंगाने हा ऐतिहासिक निर्णय आहे", असंही फडणवीस यांनी म्हटलं.अनेक वर्ष जातनिहाय जनगणना करण्याची मागणी होत असताना काँग्रेसने अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेतला नाही. मात्र, जातनिहाय जनगणना करण्यावर काँग्रेस फक्त राजकारण करत राहिलं. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाला मान्यता दिल्यामुळे समाजिक न्यायाचं नवं पर्व सुरु झालं आहे. जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी आभार मानतो", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. देशात सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेनं जातनिहाय जनगणनेचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळाचे मनःपूर्वक आभार! केंद्र सरकारचा जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असून यामुळं सर्व समाजघटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळवून देण्यास मदत करेल", असं अजित पवार म्हणाले.गेल्या अनेक वर्षांपासून जातनिहाय जनगणना करण्याची मागणी करण्यात येत होती. आता केंद्र सरकारने या संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने जातनिहाय जनगणना करण्यास मंजुरी दिली आहे.

### 1931 नंतर जनगणना होणार

केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाची आज महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत जातनिहाय जनगणना करण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या या निर्णयावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जातनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयामुळे समाजिक न्यायाचं नवं पर्व सुरु झालं असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.मोदी सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय हा ऐतिहासिक निर्णय आहे. भारतात १९३१ नंतर पहिल्यांदा जातनिहाय जनगणना होणार आहे.

---

# ही जनगणना निर्णायक ठरू शकते

## केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबद्दल आभार : खा.सुप्रिया सुळे

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्र सरकारने देशात जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. आज (३० एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या कॅबिनेट बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. यानंतर झालेल्या केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या पत्रकार परिषदेत या निर्णयाची माहिती देण्यात आली. दरम्यान या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे. विरोधी पक्षातील नेते देखील सोशल मीडियावर याबद्दल व्यक्त होताना दिसत आहेत.**



काँग्रेसचे नेते विजय वड्डेट्टीवार यांनी देखील या निर्णयाबाबत त्यांच्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. "देशात जातीनिहाय जनगणना होणार असल्याच्या निर्णयाचे आम्ही मनापासून स्वागत करतो," असे वडेट्टीवार म्हणाले आहेत.दरम्यान त्यांनी ही घोषणा बिहार निवडणुकीच्या तोंडावर करण्यात आल्याने त्याबद्दल शंका उपस्थित केली आहे. "आमचे नेते, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी "ज्यांची जितकी संख्या, त्यांची तितकी हिस्सेदारी" या स्पष्ट भूमिकेतून ही मागणी सातत्याने मांडली होती.

ओबीसी, दलित, आदिवासी आणि मागास समाजाला त्यांच्या लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व मिळावे, हा यामागचा मुख्य उद्देश होता. सत्ताधाऱ्यांनी याला याआधी स्पष्टपणे विरोध केला होता.

मात्र, आज अचानक असा निर्णय घेण्यात आला आहे. बिहारची निवडणूक जाहीर होत आहे, हे लक्षात घेता ही घोषणा केवळ निवडणुकीपुरती मर्यादित राहणार नाही याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे," असे वडेट्टीवार म्हणाले आहेत. जातीनिहाय जनगणना ही केवळ आकड्यांची मोजणी नसून, ती प्रत्येक घटकाच्या हक्काची आणि संधीची मोजणी आहे. ही जनगणना निर्णायक ठरू शकते.

### सातत्याने जातीनिहाय जनगणना व्हावी

पण केवळ तेव्हाच, जेव्हा ती प्रामाणिकपणे आणि पूर्ण पारदर्शकतेने राबवली जाईल. ही घोषणा केवळ राजकीय स्टंट न राहता, सामाजिक न्यायाच्या दिशेने एक ठोस पाऊल ठरावे, हीच आमची अपेक्षा आहे," असेही त्यांनी म्हटले आहे.केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबद्दल शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आभार व्यक्त केले आहेत. "गेली अनेक वर्षांपासून आम्ही सातत्याने जातीनिहाय जनगणना व्हावी अशी मागणी संसदेसह विविध व्यासपीठांवरुन सातत्याने करीत होतो. जातीनिहाय जनगणना झाली तर विविध जातसमूहांच्या आरक्षणाबाबतच्या मागण्यांवर निर्णय घेणे सरकारला शक्य होईल अशी भूमिका आम्ही मांडली होती. याबाबत अखेर आज केंद्र सरकारने जातिनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय देशातील विविध जातींची नेमकी संख्या व त्यांची स्थिती यावर नव्याने प्रकाश टाकणारा ठरणार आहे.

# सरकारची जातीनिहाय जनगणनेची घोषणा!

## राहुल गांधींनी उपस्थित केले पाच महत्त्वाचे प्रश्न

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्र सरकारने देशात जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. दरम्यान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी देखील या निर्णयाबद्दल सरकारचं कौतुक केलं आहे. मात्र, त्यांनी पाच महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. या जनगणनेची रचना कशी असेल? जनगणनेत केवळ आरक्षणाचाच विचार केला जाणार की त्यापुढची तयारी केली आहे? खासगी शिक्षण संस्थांमधील आरक्षणाचं काय? जनगणना कधी करणार? अंमलबजावणी कशी करणार? असे काही प्रश्न राहुल यांनी सरकारला विचारले आहेत.**

राहुल गांधी म्हणाले, "आम्ही सरकारच्या या निर्णयाचं पूर्ण समर्थन करतो. तसेच या जनगणनेची रचना कशी करायची यात काही योगदान हवं असल्यास आम्ही पूर्ण सहकार्य करू. कारण आम्ही ही मागणी लावून धरली होती. आमच्या निवडणुकीआधीच्या जाहीरनाम्यातही आम्ही जनतेला याबद्दलचं आश्वासन दिलं होतं."लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणाले, "मला इथे काही मुद्दे उपस्थित करायचे आहेत. आपल्या देशात जातीनिहाय जनगणनेची दोन उदाहरणं आहेत. यापूर्वी बिहार व तेलंगणा या राज्यांनी अशी जनगणना केली आहे. मात्र दोन्ही राज्यांच्या जनगणनेत प्रचंड मोठा फरक आहे. आम्ही यावर बरंच संशोधन केलं असून केवळ जनगणना करण्यापर्यंतचा विचार केलेला नाही. आम्ही त्याही पुढचा विचार करून ठेवला आहे. समाजिक विकास हा त्यातील महत्वाचा मुद्दा आहे. जातीनिहाय जनगणनेच्या माध्यमातून आम्ही ही गोष्ट पुढे नेऊ इच्छितो."राहुल गांधी म्हणाले, "केवळ आरक्षण नव्हे तर देशात आदिवासी, ओबीसी, दलितांची किती भागिदारी आहे? देशातील संस्थांमध्ये या सर्वांची किती व कुठे भागिदारी आहे? त्यांना किती स्थान आहे? हे या जातीनिहाय जनगणनेतून समजलं पाहिजे.



पॉवर स्ट्रक्चर आपल्याला समजलं पाहिजे. हे जनगणनेचं पुढचं पाऊल असेल. आपल्याला त्या दिशेने जावं लागेल. यासह खासगी शिक्षण संस्थांमधील आरक्षणाचा मुद्दा देखील आहेच.

आपल्या कायद्यात तशी तरतूद आहे. मात्र तो कायदा लागू करावा, त्याची अंमलबजावणी करावी. तसेच ही जनगणना कधी करणार याची तारीखही सांगावी."केंद्र सरकारने आज (३० एप्रिल) देशात जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. आगामी जनगणनेत जातीनिहाय गणना केली जाणार आहे. काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी या निर्णयाचं स्वागत केलं असून लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी देखील या निर्णयाबद्दल सरकारचं कौतुक केलं आहे. दरम्यान भाजपाने मात्र या निर्णयाचे श्रेय घेण्यावरून राहुल गांधी यांना सुनावले आहे. राहुल गांधी या निर्णयाचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप भाजपाने केला आहे.

ज्यात त्यांनी म्हटले होते की जातीनिहाय जनगणना करण्याचा कोणताही निर्णय जनगणना जाहीर झाल्यावर सार्वजनिक केला जाईल.भाजपाच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत राहुल गांधींवर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की राहुल गांधी यांनी सरकारच्या निर्णयाचे श्रेय घेणे थांबवावे कारण अमित शाह यांनी १८ सप्टेंबर २०२४ रोजीच ही घोषणा लवकरच होणार असल्याचे संकेत दिले होते.

राहुल गांधी यांनी सरकारने घेतलेल्या जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे श्रेय घेणे थांबवावे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यापूर्वीच १८ सप्टेंबर २०२४ रोजी ही घोषणा लवकरच होणार असल्याबद्दल सूचित केले होते. २०२१ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने सामाजिक-आर्थिक आणि जातीय जनगणना सुरू केली, ज्यामध्ये जातीय घटकाचा समावेश होता- १९३१ नंतर करण्यात आलेला हा पहिलाच असा प्रयत्न होता," असे मालवीय यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### राहुल गांधी काय म्हणाले?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या कॅबिनेट बैठकीत जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या दोन वर्षांपासून जातीनिहाय जनगणनेची मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लावून धरली होती. केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना राहुल गांधी म्हणाले, "केंद्र सरकारने हा निर्णय घ्यायला उशीर केला आहे, पण ठीक आहे, आता त्यावर तातडीने अंमलबजावणी करावी."राहुल गांधींनी सोशल मीडियावर पोस्ट केली असून यामध्ये जातीनिहाय जनगणनेची मागणी करणाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. "म्हणालो होतो ना, मोदींना जातिनिहाय जनगणना करावीच लागेल, आम्ही करायला भाग पाडू. हे आमचे व्हिजन आहे आणि आम्ही काळजी घेऊ की सरकार एक पारदर्शक आणि प्रभावी जातिनिहाय जनगणना करेल. देशाच्या संस्था आणि पॉवर स्ट्रक्चरमध्ये कोणाची किती भागिदारी आहे हे सर्वांना स्पष्ट कळावे.

---

# मोदींकडे लष्कराला फ्री हॅन्ड देण्याचा अधिकार नाही

## स्वतःला सुरक्षेच्या जबाबदारीतून मुक्त करण्याचा प्रयत्न

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला लष्करी कारवाईद्वारे चोख प्रत्युत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (२९ एप्रिल) हिरवा कंदिल दाखवला. मोदींच्या निवासस्थानी मंगळवारी संरक्षणविषयक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत दहशतवाद चिरडून टाकण्यासाठी कधी, कुठे व केव्हा लष्करी कारवाई करायची, याचे संपूर्ण स्वातंत्र्य (फ्री हॅन्ड) संरक्षण दलांना असेल, असा स्पष्ट व थेट संदेश मोदींनी दिला आहे. यावर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आक्षेप घेतला आहे.**





लष्कराला अशा प्रकारचे आदेश देण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतींना असतो, पंतप्रधानांना नाही, असं म्हणत प्रकाश आंबेडकर यांनी यावर आक्षेप नोंदवला आहे. तसेच लष्कराला फ्री हॅन्ड देणं, पाकिस्तानचं पाणी अडवणं ही भाजपाची एक प्रकारची जुमलेबाजी (खोटा प्रचार) असल्याचं आंबेडकर यांनी म्हटलं आहे.प्रकाश आंबेडकर यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे.

या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "भारताचे राष्ट्रपती हे भारतीय सशस्त्र दलाचे सर्वोच्च कमांडर असतात, पंतप्रधान नव्हे. त्यामुळे पंतप्रधानांनी सैन्याला फ्री हॅन्ड दिला असं म्हणणं चुकीचं आहे. पंतप्रधानांकडे असं काही करण्याचा अधिकारच नाही. राष्ट्रपतींना लष्करी कारवाई करण्याचा सल्ला देण्याचं काम कॅबिनेट करतं. पंतप्रधान एकटे असा कुठलाही निर्णय घेऊ शकत नाहीत. तसेच हा फ्री हॅन्ड म्हणजे मोदींनी स्वतःला सुरक्षेच्या जबाबदारीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख म्हणाले, "भारतीय सैन्य सुरुवातीपासूनच त्यांचं काम चांगल्या पद्धतीने करत आलं आहे आणि ते कधीही पंतप्रधानांवर अवलंबून राहिलेलं नाही. लष्करी निर्णय हे राष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांच्यातील समन्वयाचा व एकत्र घेतलेल्या निर्णयांचा भाग असतात."प्रकाश आंबेडकर म्हणाले, "मला आश्चर्य वाटतंय की ही बैठक मंत्रिमंडळ व विरोधी पक्षांच्या अनुपस्थितीत झाली आहे. मोदी राष्ट्रपती का बनू पाहतायत? पाकिस्तानचं पाणी अडवल्याचं वक्तव्य म्हणजे एक प्रकारचा जुमला (खोटं वक्तव्य) होतं. तसंच सैन्याला फ्री हॅन्ड देणं हा देखील एक जुमलाच आहे. उद्या भारतीय सैन्याने पाकिस्तानविरोधात कारवाई केली तर त्याचं श्रेय केवळ आणि केवळ भारतीय सशस्त्र दलांना दिलं पाहिजे."

### फ्री हॅन्ड दिला असं म्हणणं चुकीचं

या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "भारताचे राष्ट्रपती हे भारतीय सशस्त्र दलाचे सर्वोच्च कमांडर असतात, पंतप्रधान नव्हे. त्यामुळे पंतप्रधानांनी सैन्याला फ्री हॅन्ड दिला असं म्हणणं चुकीचं आहे. पंतप्रधानांकडे असं काही करण्याचा अधिकारच नाही. राष्ट्रपतींना लष्करी कारवाई करण्याचा सल्ला देण्याचं काम कॅबिनेट करतं.

# नेपोटिझमबद्दल किशोरी शहाणेंच्या मुलाने व्यक्त केलं मत

बॉलीवूडमधील नेपोटिझम (घराणेशाही)चा मुद्दा काही नवीन नाही. गेल्या अनेक वर्षांपासून घराणेशाही हा चर्चेचा विषय ठरत आला आहे. ८०-९० च्या दशकामध्ये अनेक दिग्गजांनी आपल्या मुलांना चित्रपटसृष्टीमध्ये आणलं. यापैकी काही स्टारकिड्सना चित्रपटसृष्टीमध्ये त्यांचे वेगळे स्थान निर्माण करण्यात यश मिळालं. तर काहींच्या पदरी मात्र अपयश आले. चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण करणे सोपे आहे पण तिथे जागा टिकवून ठेवणे मात्र त्याहून कठीण. यामुळे अनेक स्टारकिड्सना घराणेशाहीवरुन टीका व ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. घराणेशाहीच्या टीका व ट्रोलिंगवर अनेक स्टारकिड्सनी वेळोवेळी त्यांची मतं व्यक्त केली आहेत. अशातच बॉलीवूडसह मराठी सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या किशोरी शहाणे यांच्या मुलानेही घराणेशाहीवर त्याचं मत व्यक्त केलं आहे. किशोरी शहाणेंचा मुलगा बॉबी हा सुद्धा याच क्षेत्रात कार्यरत आहे. लोकमत फिल्मीशी बोलताना त्याने याबद्दल असं म्हटलं की, “मी याबद्दल कधीच विचार केला नाही. पण तरी आपण असं म्हटलं की, नेपोटिझम (घराणेशाही) आहे आणि मला त्यामुळे फायदा



होईल; तर मी लहानपणापासून एवढं सगळं काम केलं नसतं. मला कायम हेच वाटायचं की, जे काही करायचं आहे ते मला स्वत:ला करायचं आहे.”यापुढे तो म्हणाला की, “माझे आई-बाबा आहेत. मला त्यांचा खूप पाठींबा आहे आणि ते खूपच महत्त्वाचं आहे.

काही लोकांकडे असं असतं की, आई-वडिलांना या क्षेत्राबद्दल काही कल्पनाच नसते. अभिनय हे क्षेत्र नेमकं काय आहे? त्या दृष्टीकोनातून विचार केला तर त्यांच्याकडून पाठींबा किंवा मार्गदर्शन मिळालं आहे. याबद्दल ते मला म्हणतात की, आम्ही समजतो तू या क्षेत्रात आहेस; पण तरी तुझा एक वेगळा प्रवास आहे; जो तुला एकट्यानेच करायचा आहे.”यानंतर त्याने असं म्हटलं की, “घराणेशाही म्हणजे काय तर, आई-बाबांनी यापूर्वी काम केलं आहे आणि त्यांचा मुलगा त्याच क्षेत्रात आहे. मग हे प्रत्येकच क्षेत्रात होत असतं.

## तर राजेश खन्ना आज जिवंत असते

राजेश खन्ना यांचे बॉलीवूडमध्ये महत्त्वाचे योगदान मानले जाते. आजही त्यांच्या अभिनयाची, त्यांच्या गाजलेल्या भूमिकांची मोठी चर्चा होते. अभिनयाबरोबरच दिवंगत अभिनेते राजेश खन्ना यांच्या खासगी आयुष्याची मोठी चर्चा होताना दिसते. आता मुमताज यांनी एका मुलाखतीत राजेश खन्ना यांच्याबद्दल केलेले वक्तव्य चर्चेत आहे. मुमताज यांनी नुकतीच विकी लालवाणीच्या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांना विचारले की राजेश खन्ना व त्या कधी रिलेशनशिपमध्ये होत्या का? यावर उत्तर देताना मुमताज म्हणाल्या, “जर मी त्याच्याबरोबर नात्यात असते तर बरं झालं असतं. पण, मी कधीच त्याच्याबरोबर नात्यात नव्हते. मी हजारवेळा राजेश खन्नाबरोबर नात्यात नव्हते असे सांगितले आहे, पण तरीही मला लोक विचारत राहतात.”राजेश खन्ना माझी मैत्रीण अंजू महेंद्रूच्या प्रेमात होता. पण, त्याने १६ वर्षीय डिंपल कपाडियाबरोबर अचानक लग्न करण्याचा निर्णय घेतला.

## तब्बल 1.5 कोटींची कार ?

बिग बॉस’च्या १३ व्या पर्वातून अभिनेत्री शहनाझ गिलने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. तिच्या निरागस स्वभावाने तिने प्रेक्षकांची मने जिंकली. अभिनेता सिद्धार्थ शुक्लाबरोबरच्या तिच्या नात्याचीदेखील मोठी चर्चा झाली. अभिनेत्रीने काही म्युझिक व्हिडीओमध्ये काम केले आहे. तसेच ती काही बॉलीवूड चित्रपटांमध्ये दिसली आहे. सोशल मीडियावरदेखील ती सक्रिय असते.शहनाझ गिलचा चाहतावर्ग मोठा आहे. आता मात्र, अभिनेत्री तिच्या कामामुळे नाही तर तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. तिने सोशल मीडियावर काही फोटो शेअर करीत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे.शहनाझ गिलने एक नवीन कार खरेदी केली आहे. या गाडीची किंमत कोट्यवधी आहे. अभिनेत्रीने मर्सिडीज बेंझ जीएलएस ही कार खरेदी केली आहे. या गाडीची किंमत १.५७ ते १. ६५ कोटींदरम्यान आहे. नवीन गाडी घेतल्याने शहनाज आनंदी असल्याचे दिसत आहे. तिने तिच्या या नवीन गाडीबरोबर अनेक फोटो काढले आहेत. हे फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत.अभिनेत्रीने शेअर केलेल्या काही फोटोंमध्ये तिने गाडीबरोबर पोझ दिली आहे. तर काही फोटोंमध्ये ती गाडीची पूजा करत असल्याचे दिसत आहे. हे फोटो शेअर करताना अभिनेत्रीने गाडी घेण्याचे हे स्वप्न पूर्ण झाल्याचे लिहिले. तसेच, आता तिच्या कष्टाला चार चाके असल्याचे तिने म्हटले. पुढे तिने देवाचे आभारदेखील मानले आहे.शहनाझ गिलच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. “अभिनंदन”, “अशीच प्रगती करत राहा”, “तुझ्यासाठी खूप आनंदी आहे.



## ‘आता थांबायचं नाय’ चित्रपट कसा?

मराठी मनोरंजन विश्वात सध्या नवनवीन विषयांवरील चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी येत आहेत. गेल्या काही दिवसांत ‘देवमाणूस’, ‘मुक्ताई’, ‘झापुक झुपूक’ किंवा ‘सुशीला सुजीत’ असे नव्या धाटणीचे चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले. यात आता आणखी एका चित्रपटाची भर पडली आहे ती म्हणजे ‘आता थांबायचं नाय’ या चित्रपटाची. बृहन्मुंबई महानगरपलिकेच्या सफाई कामगारांच्या आयुष्याच्या सत्य घटनेवर आधारित हा चित्रपट आहे. सर्व स्तरातून या चित्रपटाचं कौतुक होत आहे. अशातच प्रसिद्ध मराठी लेखक क्षितिज पटवर्धनने या चित्रपटाचं कौतुक केलं आहे. चित्रपटाचा दिग्दर्शक शिवराज वायचळबरोबरचा फोटो त्याने शेअर केला आहे. यासह त्याने असं म्हटलं आहे की, “आपल्या आजूबाजूलाच असलेल्या पण आपण कधीच लक्ष न दिलेल्या माणसांची सुंदर गोष्ट पडद्यावर आणलीस यासाठी तुझं कौतुक करावं तितकं कमी आहे. कचराही वेगवेगळा करू न शकणारा; पण माणसांना झटक्यात वेगवेगळं करणारा समाज आपण रोज अनुभवतो. पण त्याच्यावर कधी चित्रकाराच्या हलक्या हातानं, तर कधी मजुराच्या कणखर दणक्यानं इतकं प्रभावी भाष्य केलं आहेस याचा आनंद आहे.”यानंतर त्याने असं म्हटलं अहे की, “पेपरातल्या छोट्या वाटणाऱ्या कात्रणात अनेकांच्या जगण्याची भलीमोठी पुस्तकं दडलेली असतात. याचा प्रत्यय या चित्रपटात आल्यावाचून राहत नाही. त्यासाठी विशेष अभिनंदन. प्रभावी कथा, भिडणारे संवाद, (शिवराज, ओंकार, आणि अरविंद जगताप) सिद्धार्थ जाधव अप्रतिम. प्राजक्ता, किरण, आशुतोष सर, पर्ण, ओम, प्रवीण, दीपक शिर्के, सागरचं काम केलेला अभिनेता) जबरदस्त शीर्षक गीत आणि मन व डोळे भरून टाकणारा शेवट या सगळ्या जमेच्या बाजू.

## अभिनेत्री प्रणिता सुभाष दुसऱ्यांदा होणार आई

दाक्षिणात्य तसेच बॉलीवूड चित्रपटांमध्ये काम करणारी अभिनेत्री प्रणिता सुभाषने (PRANITHA SUBHASH) तिच्या चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. ती दुसऱ्यांदा आई होणार आहे. प्रणिताने तिच्या इन्स्टाग्रामवर बेबी बंपचे फोटो शेअर करत ती गरोदर असल्याची माहिती दिली आहे. शेअर केलेल्या फोटोंमध्ये ती तिचा बेबी बंप फ्लॉंट करताना दिसत आहे. तिच्या या पोस्टवर कमेंट करून चाहते तिला शुभेच्छा देत आहेत.२०२१ मध्ये आलेल्या ‘हंगामा २’ चित्रपटात शिल्पा शेट्टीबरोबर (SHILPA SHETTY) काम करणारी अभिनेत्री प्रणिता सुभाषने २५ जुलै रोजी तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर बेबी बंपचे फोटो शेअर केले. हे फोटो शेअर करताना तिने एक कॅप्शन लिहिलं आणि ती दुसऱ्यांदा गरोदर असल्याचं सांगितलं. “राऊंड २... पँट अजिबात फिट होत नाही,” असं कॅप्शन तिने लिहिलं आहे. अभिनेत्रीने ही गुड न्यूज शेअर करताच सोशल मीडियावर चाहते कमेंट्स करून तिचे अभिनंदन करत आहेत. फोटोंमधील प्रणिता सुभाषच्या लूकबद्दल बोलायचं झाल्यास तिने निळ्या जीन्सबरोबर काळी मोनोकिनी घातली आहे. तिच्या जीन्सचे बटण उघडे असून ती तिच्या बेबी बंपवर हात ठेवून पोज देताना दिसत आहे. प्रणिता सुभाषने (PRANITHA SUBHASH HUSBAND) तीन वर्षांपूर्वी ३० मे २०२१ रोजी बंगळुरूतील एका बिझनेसमनशी लग्न केलं. तिच्या पतीचे नाव नितीन राजू आहे. तिने सोशल मीडियावर तिच्या लग्नाची माहिती देऊन चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला होता, कारण तिने गुपचूप लग्न केलं होतं. लग्नानंतर वर्षभरात तिने आनंदाची बातमी दिली होती. २०२२ मध्ये प्रणिताने एका गोंडस मुलीला जन्म दिला. त्यानंतर आता तिने दुसऱ्यांदा आई होणार असल्याची बातमी चाहत्यांना दिली आहे.



# फिरकीपटू युझवेंद्र चहलची हॅटट्रिक!

## दिल्लीला धूळ चारत मिळवला दमदार विजय

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पंजाब किंग्जचा फिरकीपटू आणि आयपीएल इतिहासातील सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज युजवेंद्र चहलने इतिहास घडवला आहे. चहलने आयपीएल २०२५ च्या ४९ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध भेदक गोलंदाजी करत हॅटट्रिक घेतली. यासह, चहल आयपीएल २०२५ मध्ये हॅटट्रिक घेणारा पहिला गोलंदाजही ठरला. याशिवाय २०२३ पासून आयपीएलमध्ये हॅटट्रिक घेणारा तो पहिला गोलंदाज आहे.**





~~आज म्हणजेच ३० एप्रिलला~~ चेपॉक स्टेडियमवर खेळवल्या जात असलेल्या या सामन्यात, चहलने प्रथम गोलंदाजी करणाऱ्या पंजाब किंग्जसाठी १९ व्या षटकात हा अद्भुत पराक्रम केला. या षटकात भारतीय लेग-स्पिनरने ४ विकेट्स घेतल्या, ज्यामध्ये एमएस धोनीचा एक आणि हॅट्रिकचा समावेश होता.या हंगामात चहलच्या कामगिरीत चढ-उतार पाहायला मिळाले आहेत. या सामन्यातही अशीच स्थिती होती, जेव्हा चहलने पहिल्या २ षटकात २३ धावा दिल्या. त्यानंतर डावखुरा फलंदाज सॅम करनची स्फोटक फलंदाजी पाहून कर्णधार श्रेयस अय्यरने त्याला गोलंदाजीसाठी बोलावले नाही. पण जसं १८व्या षटकात सॅम करन झेलबाद झाल्यानंतर धोनी फलंदाजीला आला तेव्हा श्रेयसने त्याला गोलंदाजीला बोलावलं.चहलने १९ व्या षटकाची सुरूवात वाईड बॉलने केली. मग धोनीने पहिल्या लीगल चेंडूवर षटकार मारला. पण इथून चहलने सामन्याचा रोख बदलला आणि स्वत:च्या नावे विक्रमही केला आहे. चहलने यानंतर दुसऱ्या चेंडूवर धोनीला आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवत झेलबाद केलं. त्यानंतर दीपक हुडाने तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेतल्या.चहलने यानंतर सलग तीन चेंडूवर हॅटट्रिक घेतली. चौथ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात दीपक हुडा प्रियांश आर्यकरवी झेलबाद झाला. पाचव्या चेंडूवर चहलने अंशुल कंबोजला क्लीन बोल्ड केलं. तर अखेरच्या चेंडूवर नूर अहमद मोठा फटका खेळायला गेला आणि यान्सनने त्याला झेलबाद केलं. हॅटट्रिक घेताच चहलने त्याची आयकॉनिक पोज देत मैदानात बसला आणि अशारितीने चेन्नईचा डाव १९० धावांवर आटोपण्यात मोठी भूमिका बजावली.चहल आयपीएल २०२५ मध्ये हॅटट्रिक घेणारा पहिला गोलंदाज ठरला. चहलने हॅटट्रिक घेण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी चहलने २०२३ मध्ये ही कामगिरी केली होती. त्यावेळी राजस्थान रॉयल्सचा भाग असलेल्या चहलने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध हॅटट्रिक घेतली होती. यासह, तो आयपीएलमध्ये एकापेक्षा जास्त हॅटट्रिक घेणाऱ्या मोजक्या गोलंदाजांमध्ये सामील झाला. यामध्ये अमित मिश्रा, युवराज सिंग आणि रोहित शर्मा सारखी नावे आहेत.आज म्हणजेच ३० एप्रिलला चेपॉक स्टेडियमवर खेळवल्या जात असलेल्या या सामन्यात, चहलने प्रथम गोलंदाजी करणाऱ्या पंजाब किंग्जसाठी १९ व्या षटकात हा अद्भुत पराक्रम केला. या षटकात भारतीय लेग-स्पिनरने ४ विकेट्स घेतल्या, ज्यामध्ये एमएस धोनीचा एक आणि हॅट्रिकचा समावेश होता.या हंगामात चहलच्या कामगिरीत चढ-उतार पाहायला मिळाले आहेत. या सामन्यातही अशीच स्थिती होती, जेव्हा चहलने पहिल्या २ षटकात २३ धावा दिल्या. त्यानंतर डावखुरा फलंदाज सॅम करनची स्फोटक फलंदाजी पाहून कर्णधार श्रेयस अय्यरने त्याला गोलंदाजीसाठी बोलावले नाही. पण जसं १८व्या षटकात सॅम करन झेलबाद झाल्यानंतर धोनी फलंदाजीला आला.

### आयकॉनिक पोज देत मैदानात बसला

श्रेयसने त्याला गोलंदाजीला बोलावलं.चहलने १९ व्या षटकाची सुरूवात वाईड बॉलने केली. मग धोनीने पहिल्या लीगल चेंडूवर षटकार मारला. पण इथून चहलने सामन्याचा रोख बदलला आणि स्वत:च्या नावे विक्रमही केला आहे. चहलने यानंतर दुसऱ्या चेंडूवर धोनीला आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवत झेलबाद केलं. त्यानंतर दीपक हुडाने तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेतल्या.चहलने यानंतर सलग तीन चेंडूवर हॅटट्रिक घेतली. चौथ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात दीपक हुडा प्रियांश आर्यकरवी झेलबाद झाला. पाचव्या चेंडूवर चहलने अंशुल कंबोजला क्लीन बोल्ड केलं. तर अखेरच्या चेंडूवर नूर अहमद मोठा फटका खेळायला गेला आणि यान्सनने त्याला झेलबाद केलं. हॅटट्रिक घेताच चहलने त्याची आयकॉनिक पोज देत मैदानात बसला आणि अशारितीने चेन्नईचा डाव १९० धावांवर आटोपण्यात मोठी भूमिका बजावली.

# मेरी कोम आणि पतीचा २ वर्षांपूर्वीच घटस्फोट

## अफेअरच्या चर्चांदरम्यान मेरीने दिली माहिती; पोस्ट केली शेअर

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारताची सर्वात यशस्वी बॉक्सर आणि ऑलिम्पिक पदक विजेती मेरी कोम सर्वांच्या परिचयाची आहे. आठ वेळा विश्वविजेती आणि पद्मभूषण पुरस्कार विजेती मेरी कोमने तिच्या बॉक्सिंग कारकिर्दीतून देशाचे नाव उंचावले आहे. गेल्या काही काळापासून मेरी कोम चर्चेत आहे. परंतु, यावेळी ती तिच्या व्यावसायिक आयुष्यामुळे नव्हे तर तिच्या खासगी आयुष्यातील एका निर्णयामुळे चर्चेत आली आहे.**






मेरी कोम आणि तिचा पती करूंग ओन्खोलर कोम (ऑन्लर) हे आता एकत्र राहत नाहीत. ते २०२२ पासून वेगळे राहत असल्याच्या बातम्या येत होत्या. असे म्हटले जात आहे की दोघांमध्ये बराच काळ मतभेद होते आणि आता हे प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचले आहे. तर मेरी कोमने आता घटस्फोट घेतले असल्याचे स्वत: कबुल केले आहे. मेरी कोमने तिच्या वकिलाने जारी केलेल्या अधिकृत निवेदनाद्वारे माहिती दिली की ती आणि तिचा पती करूंग ओन्खोलोरचा २० डिसेंबर २०२३ला कायदेशीर घटस्फोट झाला आहे. मेरी कोम आणि तिचा सहकारी हितेश चौधरी यांच्यातील संबंधांच्या वाढत्या अफवा आणि ऑनलाइन चर्चांदरम्यान ही घोषणा करण्यात आली आहे.मेरी कोमच्या अधिकृत निवेदनामध्ये तिने अफेअरबाबत नकार दिला आहे. या दाव्यांचे खंडन करताना, मेरी कोमने कोणाबरोबरही रिलेशनशिपमध्ये नसल्याचे म्हटले आहे. मेरीने स्पष्ट केले की ओन्खोलर आणि ती दोघांच्या सहमतीने वेगळे झाले आहेत आणि ते जवळजवळ दोन वर्षांपासून वेगळे राहत आहेत.... निवेदनात म्हटले आहे की, या चर्चा आणि चुकीच्या मीडिया रिपोर्ट्सच्या पार्श्वभूमीवर, मी खालील स्पष्टीकरण देऊ इच्छिते: "एमसी मेरी कोम आणि ओन्खोलर (ओनलर) कोम आता विवाहित नाहीत. त्यांनी २० डिसेंबर २०२३ रोजी दोन्ही कुटुंबातील सदस्यांच्या आणि निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत KOM प्रथा कायद्यानुसार परस्पर संमतीने घटस्फोट घेतला आहे."हितेश चौधरीबाबतच्या अफेयरच्या अफवांवर मेरी कोमच्या निवेदनात म्हटले, "माझ्या क्लायंटचे हितेश चौधरी किंवा इतर कोणाशीही प्रेमसंबंध असल्याच्या अफवा स्पष्टपणे नाकारल्या जातात आणि कोणत्याही मीडिया प्लॅटफॉर्मने यासंबंधित माहिती देऊ नये," असे निवेदनात म्हटले आहे.

### एका निर्णयामुळे चर्चेत

मेरी कोम आणि तिचा पती करूंग ओन्खोलर कोम (ऑन्लर) हे आता एकत्र राहत नाहीत. ते २०२२ पासून वेगळे राहत असल्याच्या बातम्या येत होत्या. असे म्हटले जात आहे की दोघांमध्ये बराच काळ मतभेद होते आणि आता हे प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचले आहे. तर मेरी कोमने आता घटस्फोट घेतले असल्याचे स्वत: कबुल केले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार ।
। दि. 1 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांमधून आधुनिक लोकशाहीचे दर्शन

# संत तुकडोजी महाराज यांचे कार्य दिशादर्शक!

## महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे यांचे प्रतिपादन



**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**महात्मा बसवेश्वर महाराज यांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून सर्व स्तरातील लोकांना समान अधिकार दिले,समाजातील लोकांनी स्वत:च्या हक्काबाबत जागरूक व्हावे यासाठी शिक्षण व सामाजिक जाणीव देण्याचा प्रयत्न केला तसेच समाजातील उपेक्षितांना मदत करण्यासाठी अनेक सामाजिक उपक्रम सुरु केले, त्यांच्या विचारांमधून आपल्याला आधुनिक लोकशाहीचे दर्शन घडते, तर थोर संत तुकडोजी महाराज यांनी समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल यासाठी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले असल्याचे प्रतिपादन उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी केले.**

महात्मा बसवेश्वर महाराज तसेच संत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम आणि उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी तर निगडी येथील महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्यास उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे हे बोलत होते.

यावेळी माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते उमाकांत शेटे, अण्णा बिरादार, दत्ता बहिरवाडे, राजेद्र घावटे,बसवराज कुल्लाले, चंद्रशेखर दलाल, शिवाजी साखरे, हेमंत हरहरे, विजयकुमार स्वामी, दानिश निमशेट्टी यांच्यासह मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने तसेच महात्मा बसवेश्वर पुतळा समितीच्या सहकार्यातून जगतज्योती महात्मा बसवेश्वर विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये व्याख्यान,भजन, वकृत्व स्पर्धा, पिंपरी साहित्य मंच आयोजित कवी संमेलन, महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण कार्यक्रम,भव्य बसवेश्वर रॅली असे कार्यक्रम झाले. तर प्रा. संजय कळमकर यांचे 'जगण्याच्या आनंदी वाटा' या विषयावर व डॉ. श्रीपाल सबनीस यांचे 'महात्मा बसवेश्वर व भारतीय लोकशाही' या विषयावर व्याख्यान झाले. तसेच 'मानवी जीवनाचे सत्य' या विषयावर ह.भ.प. श्री लक्ष्मण महाराज राजगुरू यांचा भारुडाचा कार्यक्रम सादर झाला. या सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बसवेश्वर यांच्या विचारांचा आदर्श आज सर्वांनी घेण्याची गरज

महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त 'महात्मा बसवेश्वर व भारतीय लोकशाही' या विषयावर जेष्ठ विचारवंत साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलताना डॉ.श्रीपाल सबनीस म्हणाले की महात्मा बसवेश्वर यांनी समाजात सामाजिक समानता, न्याय, लोकशाही आणि लोकसहभाग यांसारख्या मूल्यांचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांनी वर्णव्यवस्थेला विरोध करून सर्वसामान्य जनतेला समान अधिकार मिVळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यामुळे लोकशाही व्यवस्थेची मुळे अधिक मजबूत झाली आहेत असे सांगून महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा आदर्श आज सर्वांनी घेण्याची गरज असल्याचे मतही यावेळी त्यांनी मांडले.


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Gayatri English Medium School & Jr. College, Moshi
We're Hiring
AI/ML Freshers!
Eligible?
• B.E./B.Tech in CS/IT/AI/DS
• Solid ML & Python skills
• Passion for AI/ML?
Internship-cum-Placement | Min. 6.5 CGPA
Apply now & work on real-world AI projects!
APPLY TODAY!
Let's build the future together.
Location: Pune
gayatriems@gmail.com
9689881670


ADMISSION OPEN
From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation
Batch
"यत् भावो – तत् भवति"
Our Courses
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> 'C ++' Language
> Basic Java
> Basic Tally
> M. S. Office
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool